24 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी शोधनिबंध झळकणार नियतकालिकांत

## अधिकाधिक मिळणार स्थान; मराठी भाषा धोरण अंमलबजावणीचे शासनाचे आदेश

**संदीप खांडेकर :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : राज्यातील विद्यापीठे व संशोधन संस्थांतर्फे प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांमधून मराठी भाषेतील शोधनिबंध अधिकाधिक प्रसिद्ध केले जाणार आहेत. यापूर्वी केवळ मोजकेच शोधनिबंध नियतकालिकांत प्रसिद्ध केले जात होते. शासनाच्या आदेशाने मात्र शोधनिबंधांना नियतकालिकांत स्थान मिळणार आहे. मात्र, वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी ऑनलाईन नियतकालिकांचे फोफावलेले पीक कधी थांबणार, हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे.



मराठी भाषा धोरणातील व त्यांची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने तसे परिपत्रक शासनातर्फे विद्यापीठांना पाठविले आहे. त्यात शोधनिबंधांवर विशेषत्वाने प्रकाश टाकला आहे. विद्यापीठ व संशोधन संस्थांत विविध विषयांच्या अनुषंगाने संशोधन केले जाते. ते समाजोपयोगी व्हावे, असा दृष्टिकोन संशोधकांचा असतो. बऱ्याच वेळा संशोधन झाल्यानंतर ते प्रबंधात अडकून पडते. विद्यापीठात त्याची एक प्रत सादर केल्यानंतर या संशोधनाकडे दुर्लक्ष होते. ते विद्यार्थी, अभ्यासक, शिक्षण क्षेत्रांतील तज्ज्ञांपर्यंत पोचत नाही.

वरिष्ठ वेतन श्रेणीकरिता संशोधन ऑनलाइन नियतकालिकात प्रसिद्ध करण्याचा ट्रेंड जोरात आहे. हे संशोधन लेखक व ऑनलाईन नियतकालिकापुरते मर्यादित राहते. ते इतर घटकांपर्यंत पोचत नाही. त्यामुळे गंभीर व समाजोपयोगी विषयावरील संशोधनाचा विचार होत नाही. शासनाच्या या निर्णयाने मात्र मराठी भाषेतील शोधनिबंध प्रकाशझोतात येणार आहेत.

> **“ दहा वर्षांत वरिष्ठ श्रेणीच्या मान्यतेसाठी ऑनलाईन नियतकालिके निर्माण झाली आहेत. परिणामी गंभीर विषयांचे शोधनिबंध प्रकाशझोतात येत नाहीत. ऑनलाईन नियतकालिकांचे जग मर्यादित स्वरूपाचे आहे.**
> **- डॉ. रणधीर शिंदे,** मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ.

### परिपत्रकात आणखी काय

- राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या प्रशासकीय कामात इंग्रजीसोबत मराठीचा वापर अनिवार्य
- परिसरातील वस्तूंची नावे, सूचनाफलकांत मराठीचा वापर बंधनकारक
- महाविद्यालये व विद्यापीठे यांची संकेतस्थळे, त्यातील माहिती मराठीत उपलब्ध करून देणे आवश्यक
- अमराठी विद्यार्थ्यांना मराठी शिकण्यासाठी उत्तेजन मिळणार
- विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागातर्फे मराठी संस्कृतीचा परिचय सर्व विद्याशाखांना करून दिला जाणार
- चर्चासत्रे, परिषदा, कार्यशाळा, परिसंवादात मराठी भाषेचा कटाक्षाने वापर होणार

24 JAN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारणा महाविद्यालयातील खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

- **महाविद्यालयातील खेळाडूंचे कबड्डी, फुटबॉल, कुस्ती स्पर्धेत यश**
- **राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत चमक दाखवण्याची खेळाडूंना संधी**

प्रतिनिधी
वारणानगर

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयातील अनेक खेळाडूंची आंतरविभागीय विविध क्रीडा स्पर्धात यश संपादन करून राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

एका साध्या समारंभात श्री वारणा विभाग शिक्षण मंडळाच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम आणि प्रभारी प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धे पर्यंत पोहोचून यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती देणार असल्याचे संस्थेच्या वतीने प्रशासकीय अधिकारी डॉक्टर वासंती रासम यांनी सांगितले. यावेळी क्रीडा संचालक आण्णासो पाटील यांनी विविध खेळातील यशाबद्दल माहिती दिली.

विद्यापीठ स्तरावरती सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी स्पर्धा संपन्न झाल्या. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बास्केटबॉल, फुटबॉल, कबड्डी याच बरोबर कुस्ती व जुदो या वैयक्तिक खेळ प्रकारातही यश संपादन केले आहे.

ग्वाल्हेर येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठ बास्केटबॉल पुरुष स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात महाविद्यालयाचा क्षितीज बेनाडे, जयकुमार देसाई यांची निवड झाली आहे. तसेच इंदोर येथे झालेल्या आंतर विद्यापीठ बास्केटबॉल महिला स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघामध्ये महाविद्यालयाच्या दीपाली खांबे, शिवानी जाधव, प्रिया कोळेकर यांनी सहभाग नोंदविला आहे. तसेच प्रेरणा गराडे हिने शिवाजी विद्यापीठ मार्फत कोटा येथे झालेल्या फुटबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेस पात्र ठरली आहे. तसेच प्रवीण नाईकवडी यांनी कबड्डी स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पटकावून खेलो इंडिया स्पर्धेस पात्र झाला आहे. महाविद्यालयाने कबड्डी स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठांमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. तसेच कुस्ती संघात तृतीय क्रमांक पटकावून विविध वजन गटामध्ये आशितोष पाटील, सुजित कणेरकर, ऋतुराज मिसाळ, ओंकार लोहार यांनी भरघोस यश संपादन केले आहे. तर जुदो खेळ प्रकारात तुषार सातपुते यांने १०० किलो वजनी गटामध्ये सुवर्णपदक पटकावून कानपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची अभिनंदनीय निवड झाली आहे. विजेत्या संघातील यशस्वी विद्यार्थ्यांना आ. डॉ. विनय कोरे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे. क्रीडा संचालक प्रा. आण्णासो पाटील, विशाल चव्हाण यांचे खेळाडूंना मार्गदर्शन लाभले.



**वारणानगर : येथील वारणा महाविद्यालयातील खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. विजेत्या खेळाडू समवेत प्रशासकीय अधिकारी डॉ. वासंती रासम, प्राचार्य डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, प्रा. आण्णा पाटील, विशाल चव्हाण.**